# क्रांतिवीर रंगरावदादा : स्फूर्तिदायी जीवनपट

**ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांचे मंगळवारी निधन झाले. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे स्मरण.**

विमलनाथ शेटे

भाई रंगरावदादा यांचे नाव माहीत नाही असा माणूस सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यांत सापडणार नाही. स्पष्ट बोलणारा, कोणापुढे अकारण मान न झुकविणारा, सत्याची बाजू घेऊन सतत झगडत राहणारा आणि भल्याभल्यांचे काळे बुरखे फाडून चिंध्या करणारा, मोठ्या मनाचा पोलादी माणूस म्हणूनच भाई दादांना आम्ही ओळखतो.

भाई दादा सांगली जिल्ह्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांच्या बालपणाकडे वळून पाहिले, तर त्यांचे संपूर्ण जीवनच स्फूर्तिदायक असेच घडलेले आहे. २५ डिसेंबर १९१९ रोजी भाई रंगरावदादांचा जन्म अंकलखोप येथे झाला. त्यांचे संपूर्ण नाव रंगराव विठ्ठल पाटील. भाई रंगरावदादा या नावाने महाराष्ट्राला परिचित. ताराराणी विद्यापीठाचे अध्यक्ष (कै.) व्ही. टी. पाटील त्यांचे चुलते. त्यांचे प्राथमिक शिक्षण शिगाव येथे पूर्ण झाले आणि मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या वटवृक्षाच्या छायेखाली झाले. विद्यार्थीदशेपासून त्यांना सार्वजनिक कार्याची आवड लागली. गोरगरिबांची सेवा करण्यात व इतरांना मदत करण्यात दादांना आनंद मिळत असे. दादांचे शिक्षण चळवळीतील सहभागामुळे पूर्ण झाले नाही. त्यांच्या रूपाने एक समाजसेवक समाजाला मिळाला, हे मात्र विसरून चालणार नाही. गरीब व अस्पृश्य समाजावर कोणी अन्याय केला, तर ते दादांना कधीही सहन होत नसे.

महात्मा फुले, लोकमान्य टिळक, आगरकर व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा जबरदस्त पगडा त्यांच्या मनावर खोलवर रुजला होता. १९४२ च्या 'चले जाव', स्वराज्यप्राप्तीच्या लढ्यात त्यांनी केलेली कामगिरी इतिहासात लिहून ठेवावी अशी तेजस्वी आहे. क्रांतिसिंह नाना पाटील, रामानंद भारती, वसंतदादा पाटील, बर्डे गुरुजी, पांडू मास्तर, भाई माधवराव बागल, यशवंतराव चव्हाण यांच्या समवेत त्यांनी केलेले काम स्फूर्तिदायक आहे.

प्रतिसरकार स्थापनेतही दादांचा मोठा सहभाग होता. गटवार पद्धतीने प्रतिसरकारची कामे होत होती. आपापला गट स्वतंत्र विचाराने काम करीत होता. दादांचा स्वतंत्र गट होता; पण तो सर्व गटांशी संबंध ठेवून आपल्या स्वतंत्र विचाराने काम करू लागला. गावोगावी प्रचार करण्यात दादा सर्व आघाड्यांवर होते. हजारो लोकांना जागे करून स्वातंत्र्यासाठी लढा देण्यासाठी भाई दादांनी स्फूर्ती दिली, प्रेरणा दिली. एवढ्यावरच दादा थांबले नाहीत, तर स्वतः सांगली संस्थान हद्दीतील नांद्रे रेल्वेस्टेशन जाळण्यात सहभागी झाले. जेथे संधी मिळेल तेथे धावत जाऊन दादांनी अनेक ठिकाणी सरकारी रेकॉर्ड जाळणे, तारा तोडणे, आगगाड्या पाडणे इत्यादी धाडसाची कामे त्या कठीण प्रसंगी वेगवेगळ्या ठिकाणी स्वयंस्फूर्तीने पार पाडली. प्रतिसरकारने व्यापलेल्या पाचशे ते सहाशे गावांच्या टापूत त्यांनी अत्यंत मोलाची कामगिरी केली. या भागात प्रतिसरकारचा स्वतंत्रपणे राज्य कारभार सुरू झाल्याने एकंदरीत लोकांचे जीवन, वित्त व अब्रू यांचे संरक्षण प्रतिसरकारकडून होऊ लागल्याने त्याला जनतेचा संपूर्ण पाठिंबा मिळू लागला. क्रांतिवीर बर्डे गुरुजी, नाना पाटील, पांडू मास्तर व भाई रंगरावदादा यांनी जी प्रतिसरकारची कामे केली, त्याला तत्कालीन सातारा जिल्ह्यात तोड नाही. प्रतिसरकार ग्रामस्वराज्य हे त्या वेळचे सूत्र होते. गावोगावी न्यायदान मंडळे स्थापन करणे, हुंडा न घेता लग्न करणे, दारूबंदी, अस्पृश्यता निवारण आदी विधायक कामे चालू होती. दादांनी तर सामाजिक विषमतेविरुद्ध बंड पुकारले होते. दादा हे सर्व करीत असताना ब्रिटिशांची करडी नजर त्यांच्यावर होती. दादांना काही वेळा क्रिमिनल गुंडांशीही सामना करावा लागे; परंतु दादांची शरीरयष्टी



पाहिल्यानंतर गुंडांना दहशत बसत होती. ते इंग्रज व गुंड यांच्या संयुक्त आघाडीला न डगमगता सामोरे गेले. अखेर २४ जुलै १९४५ रोजी ब्रिटिशांनी अचानक छापा घालून त्यांना अटक करून आष्टा येथे लॉकअपमध्ये आणि नंतर नाशिक-येरवडा जेलमध्ये ठेवले. १८ डिसेंबर १९४६ रोजी त्यांची सुटका झाली.

दादांचे एक ध्येय होते- ब्रिटिश सत्ता खिळखिळी केल्याशिवाय स्वराज्यप्राप्तीचे ध्येय साकार होणार नाही. ते तुरुंगात होते तरी जेलमधील नेत्यांबरोबर सतत विचार विनिमय करून ब्रिटिश सत्ता उखडून टाकण्यासाठी आपल्या तेजस्वी विचारांची धार त्यांच्यासमोर मांडत असत.

दादांची झेपही गरुडझेप होती. त्यांचे विचार व कार्य यांत त्यांनी कधीच फरक केला नाही. दादांची झेप लक्षात घेऊन १९४६ मध्ये त्यांना सातारा जिल्हा काँग्रेस कार्यकारिणीवर वाळवा तालुका प्रतिनिधी म्हणून घेण्यात आले. पुढे काँग्रेस पक्षात मानद सचिव म्हणूनही काम केले. १९४६ ते १९४८ या कालावधीत त्यांनी काँग्रेस संघटना बळकट केली. त्यांच्या भाषणाने, विचाराने काँग्रेस संघटनेचा पाया मजबूत झाला. महात्मा गांधींची हत्या झाल्यानंतर काँग्रेसमध्ये घटनात्मक बदल झाला. प्रभावी नेतृत्व करणारी मंडळी काँग्रेसमधून बाहेर पडली. देशभक्त केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, खाडिलकर, तुळशीदास जाधव, भाई माधवराव बागल, क्रांतिसिंह नाना पाटील व भाई रंगरावदादाही बाहेर पडले. त्यांच्याबरोबर शेतकरी कामगार पक्ष स्थापन करून काम करू लागले. समाजातील अन्याय, सावकारशाही, काळाबाजार, भ्रष्टाचार, वशिलेबाजी यांविरुद्ध दादांनी घणाघाती हल्ले चढविले. शे.का. पक्षाच्या नेत्यांनी त्यांना कधीच दूर ठेवले नाही. त्यांची ढाल पुढे करून सभा जिंकल्या, सत्ता मिळविली. बराचसा कालखंड शे.का. पक्षात गेल्याने भाई रंगरावदादा म्हणून लोकप्रियता मिळवून महाराष्ट्र त्यांना ओळखू लागला.

दादांनी शिक्षण क्षेत्रातही बहुमोल कामगिरी केली. वारणा सहकारी साखर कारखाना उभारणीतही त्यांचा सिंहाचा वाटा आहे. विविध संस्थांच्या माध्यमातून विधायक कार्याचा डोंगर उभा केला. वारणा कारखान्यात सत्ताधारी शेतकरी सभासद व भ्रष्टाचार यातला संघर्ष अगदी टोकाला गेला होता. त्या वेळी दादांनी एक नैतिक जबाबदारी म्हणून दोघांनाही योग्य न्याय मिळवून दिला.

शे.का. पक्षात एकोपा न होण्याने मतभेद वाढले. दादांना ते आवडले नाही. आणीबाणीनंतर पुन्हा काँग्रेस प्रवेश केला. काँग्रेसला वाहून घेतले. ग्रामीण भाषेत त्यांची वक्तृत्व कला चांगली असल्याने शे.का. पक्षाचे आद्यप्रवर्तक व प्रचारक म्हणून स्वातंत्र्यसैनिक सन्मान समितीवर त्यांची निवड झाली. सदस्य, अध्यक्ष व गौरव समितीचेही त्यांनी काम पाहिले. स्वातंत्र्यसैनिकांना पेन्शन मिळवून देण्यातही त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

ताराराणी विद्यापीठाचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. दादा ज्या ज्या पदावर गेले, त्या त्या पदाला त्यांनी कधी कमीपणा दिला नाही. उलटपक्षी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. आयुष्यभर सेवेचे काम केले.

दै सकाळ २८ जुलै ०६